# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर- २३७/२०२४

**अपिलार्थी, श्री.नितीन देशमुख**
००१, सावित्री आवास,
मोहनानंद नगर, मांजर्ली,
बदलापूर (प), जि.ठाणे ४२१ ५०३.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, पाटगाव,
ता.मुरबाड, जि.ठाणे.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी
पंचायत समिती कार्यालय मुरबाड,
ता.मुरबाड, जि.ठाणे ४२१ ४०१.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १०.०६.२०२४**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २१.०४.२०२३ | -- | २०.०६.२०२३ | -- |

अपिलार्थी यांनी दि. १२.०१.२०४ रोजीच्या अर्जान्वये *" माहिती अधिकारी यांनी उत्तर दिलेले नाही. "*असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १०.०६.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.आनंद वामन मुरेकर, विस्तार अधिकारी (ग्रा.पं.), पंचायत समिती मुरबाड उपस्थित आहेत. तसेच तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.संजय राजु ठाकरे, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय पाटगांव, ता.मुरबाड उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*" दि.०१ एप्रिल २०१७ ते दि.२१.०४.२०२३ या कालावधीतील प्रतिवर्षी ऑडिट रिपोर्टच्या प्रति नमुना २७ लेखा परीक्षणातील आक्षेपाच्या पूर्ततेच्या मासिक विवरण नोंदवही नमुना ३० ग्रामपंचायत लेखा परीक्षण आक्षेप पूर्तता नोंदवही."*

सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान सांगितले की,अपिलार्थी यांना दि.१७.०७.२०२३ रोजी माहिती पुरविली आहे. त्याबाबतची पोहोच सादर केली आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच उभयपक्षांचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती दिलेली आहे. तसेच सुनावणी दरम्यान प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी सांगितले की, प्रथम अपिल सुनावणीच्या रोजनाम्यामध्ये अपिलार्थी यांना माहिती दिलेली असल्याची नोंद आहे. अपिलार्थी यांना माहिती पुरविली असताना देखिल त्यांनी द्वितीय अपिल सादर केले आहे. ही गंभीर बाब आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. पुढील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी माहिती मिळाली असतानाही द्वितीय अपिल सादर केलेअसल्याबाबचा खुलासा सादर करणे योग्य होईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

१. अपिलार्थी यांनी त्यांना माहिती मिळाली असताना सुध्दा द्वितीय अपील दाखल केले आहे, याबाबतचा खुलासा दि.०५.०८.२०२४ रोजीच्या सुनावणीच्या वेळी आयोगासमोर सादर करावा.

२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.०५.०८.२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता घेण्यात येईल.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १० जून , २०२४ .

(शेखर चन्ने)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ